# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे-१

Web:www.jdhepune.info

E_mail ID- jdhepune@gmail.com

फोन नं.०२०-२६१२७८३३/२६०५१६३२

फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/वेतननिश्चिती/शिबीर/२०२०/०९

दि.०१/०१/२०२०

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतननिश्चितीस मान्यता देणेसाठी शिबीराचे आयोजन करणेबाबत...

उपरोक्त विषयाचे संदर्भात या विभागाच्या अधिनस्त असलेल्या अकृषि / अभिमत / मुक्त विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीस मान्यता देणेबाबत खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार जिल्हानिहाय शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे:-

| अ.क्र | जिल्हयाचे नाव | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ०६/०१/२०२० | स.१० ते सायं.६ वा. | नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे |
| २. | नाशिक | ०७/०१/२०२० | स.१० ते सायं.६ वा. | |
| ३. | पुणे शहर | ०८/०१/२०२० | स.१० ते सायं.६ वा. | |
| ४. | पुणे ग्रामीण | ०९/०१/२०२० | स.१० ते सायं.६ वा. | |
| ५. | अकृषि / अभिमत / मुक्त विद्यापीठे | १०/०१/२०२० | स.१० ते सायं.६ वा. | |

उपरोक्त शिबीरामध्ये विद्यापीठ/महाविद्यालयात नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती, कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी विद्यापीठाने शिफारस केलेल्या शिक्षकीय कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती व इतर प्रलंबित वेतननिश्चितीच्या प्रस्तावाची छाननी करुन, छाननीअंती पात्र ठरणाऱ्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीस मान्यता देण्यात येणार आहे.

प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे:-

अ) नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती:-

i) शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे मूळ सेवापुस्तक व वैयक्तिक संचिका,
ii) दि.०१/१०/२०११ व दि.०१/१०/२०१७ रोजीची या कार्यालयाने दिलेली शिक्षक/शिक्षकेतर पदमान्यता,
iii) सन २०११-२०१२ ते सन २०१७-१८ या कालावधीत कार्यभार वाढला असल्यास, कार्यभार वाढीची वर्षनिहाय कारणांचा तपशील,

iv) विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाने तपासलेली व मा.सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांनी प्रमाणित केलेली बिंदूनामावली,
v) पदभरतीसाठी या कार्यालयाने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत,
vi) जाहिरात,
vii) आवदेनपत्रे,
viii) छाननी समिती अहवाल,
ix) मुलाखतीस उपस्थिती असलेल्या उमेदवारांची स्वाक्षरी असलेली यादी,
x) विद्यापीठ निवड समितीचा संपुर्ण अहवाल,
xi) महाविद्यालय/व्यवस्थापनाचे नियुक्ती आदेश,
xii) नियुक्त उमेदवाराचा रुजू अहवाल,
xiii) नियुक्त उमेदवारास विद्यापीठाने दिलेली मान्यता,
xiv) शैक्षणिक अर्हतेची सर्व प्रमाणपत्रे/गुणपत्रिका व जन्म पुराव्यासंबंधी कागदपत्रे,
xv) अनुभवाची प्रमाणपत्रे/कागदपत्रे,
xvi) उमेदवार मागासवर्गीय असल्यास-जात वैधता प्रमाणपत्र,
xvii) इतर मागासवर्गीय उमेदवास असल्यास-उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र,
xviii) अनुकंपा तत्वावर नियुक्ती असल्यास, मा.संचालनालयाच्या मान्यतेसह इतर सर्व आवश्यक कागदपत्रे,
xix) उक्त पदांकरिता करण्यात आलेल्या नियुक्तीसंदर्भात कोणतेही न्यायालयीन प्रकरण/चौकशी समितीचा अहवाल प्रलंबित नसल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र,

<u>ब) कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी शिफारस केलेल्या शिक्षकीय कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती:-</u>

i) शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे मूळ सेवापुस्तक व वैयक्तिक संचिका,
ii) विद्यापीठाकडील कॅस समितीचा संपूर्ण अहवाल (जोडपत्रांसह),
iii) उदबोधन वर्ग/उजळणी वर्ग प्रमाणपत्रे,
iv) कॅस समिती अहवालात नमुद असलेले संशोधन विषयक प्रकाशने,
v) शिक्षकीय कर्मचाऱ्यांसंबंधी वेळोवेळी झालेल्या नियुक्त्यांसंदर्भातील वेळोवेळी देण्यात आलेल्या विद्यापीठ मान्यतेच्या प्रती,
vi) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/कागदपत्रे,
vii) यापुर्वी वेळोवेळी करण्यात आलेल्या वेतननिश्चितीच्या प्रती,

<u>क) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीस मान्यतेची वेतननिश्चिती:-</u>

i) शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे मूळ सेवापुस्तक व वैयक्तिक संचिका,
ii) विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाने तपासलेली व मा.सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांनी प्रमाणित केलेली बिंदूनामावली,
iii) पदोन्नतीपुर्वी प्रसिध्द करण्यात आलेली सेवाजेष्ठता यादी (कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी असलेली),
iv) व्यवस्थापनाचा पदोन्नती देण्यासंदर्भातील ठराव,
v) पदोन्नतीचे आदेश,
vi) पदोन्नत पदावरील रुजू अहवाल,
vii) शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता प्रमाणपत्रे,
viii) जात वैधता प्रमाणपत्र,
xx) उक्त पदोन्नती/सेवाजेष्ठतेसंदर्भात कोणत्याही कर्मचाऱ्याची तक्रार / आक्षेप नसल्याचे व पदोन्नती नियमानुसार असल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र,

तरी आपल्या विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीच्या प्रस्तावांची आपल्या स्तरावरुन नियमातील तरतूदीनुसार छाननी/तपासणी करुन, अशा पात्र ठरणाऱ्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव उपरोक्त प्रमाणे आयोजित केलेल्या शिबीरात सादर करावयाचे आहेत.

**(डॉ.मोहन खताळ)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.